**International Journal of Advance and Applied Research**
www.ijaar.co.in
**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 7.328**
**Peer Reviewed** **Bi-Monthly**
**Vol.10 No.3** **Jan – Feb 2023**

# भारतीय कृषी धोरण व पारधी जमातीतील शेतकऱ्यांची स्थिती व आव्हाने

**डॉ. प्रल्हाद धोटे**
सहयोगी प्राध्यापकए जोतीराव फुले समाजकार्य महाविद्यालय उमरेड, जि-नागपूर
***Corresponding Author-* डॉ. प्रल्हाद धोटे**
ईमेल- pralhaddhote50@gmail.com
**DOI- 10.5281/zenodo.7701459**

**प्रस्तावना:-**

भारतीय शेती हा भारतीय अर्थव्यस्थेचे मुख्य स्त्रोत आहे. सिंधुघाटी संस्कृतीपासून भारतीय कृषीचे अस्तित्व गणल्या गेले आहे. भारतीय स्वतंत्र्यपूर्वी व भारत स्वतंत्र्य झाल्यानंतरच्या काळात, व्यापार, रोजगार, दळणवळण व जिवन जगण्याचे मुख्य स्त्रोत म्हणून भारतीय कृषीचे महत्व आजही आहे. कधीकाळी पारंपरीक पध्दतीने केली जाणारी शेती आज नाविन्य व आधुनिकतेचे वळण घेत आहे. १९६० नंतरच्या कृषीक्षेत्रात आलेली हरितक्रांती हा मैलाचा दगड ठरत आहे. याच्यापुढे गेल्यास २००७ मध्ये देषाच्या सकल कृषी उत्पादनात कृषी व संबधीत क्षेत्राचा वाटा हा १६.६ टक्के होता, २०११ मध्ये १५.१ टक्के होता. भारतात सद्याच्या स्थित आर्थिक बाबतीत ६५ टक्के क्षेत्र हे कृषीषी निगडीत आहे. भारतात २०१५ नुसार १२,३७,९८५ आदीवासी शेतकारी आहे. भारतातील आदीवासी शेतकारी आजही दारिद्रियात जिवन जगत आहे. जंगलव्याप्त शेत, जंगली प्राण्यांमुळे शेतीचे नुकसान, शासकीय कृषी धोरणापासून वंचित, शेती मालकी हक्काचा प्रष्न पारंपारीक शेतीकरण्याच्या अडचणी, सिंचनाचा अभाव, कृषीतंत्रज्ञान व मार्गदर्षनाचा अभाव, जातीप्रमाण पत्राची अडचण यामुळे आदिवसी शेतकऱ्यांचे प्रष्न भयंकर आहे. त्यातच आदिवासी मधील, पारधी जमातीतील शेतकऱ्यांचे प्रष्न अतिषय गंभीर आहे.

नागपूर जिल्यातील सावनेर, काटोल, पारषिवनी, कामठी, भिवापूर, उमरेड, हिंगणा, कळमेष्वर अषा बारा तालूक्यात डोंगरगाव, उमठा, देहेगांव, शेकनगर, वानाडोंगरी, गडेपार, राजुरवाडी, चांपा, वळद या गावात पारधी कुटुंबे स्थायी स्वरूपात आढळते. जवळपास ५५० पारधी कुटुंबे स्थायी आहेत. एकुण पारधी कुटुंबातील २१ टक्के कुटंबाकडे शेती आहे. यामध्ये १६ टक्के शेतकरी अल्पभुधारक आहे. असलेल्या शेतीपैकी १७ टक्के शेती कोरडवाहू आहे. वनहक्क कायदा २००६ नुसार परंपरागत वनाचे रक्षण करण्याचा हक्क या कायद्यामुळे आदिवासींना मिळाला जंगलातील वन जमिनी व वहीवार याबद्दल आदिवासींना हक्क मान्य झाले. आदिवासी शेतकऱ्यासाठी शासकीय धोरणानुससार महाराष्ट्रात ८५ टक्के आदिवसी कुटुंबे शेती व्यवसायाषी निगडीत आहे. यापैकी ४० टक्के आदिवासी शेतकरी असुन ४५ टक्के शेतमजुर आहे. आदिवासी शेतकरींयांना वीज पंप/तेलपंप, विहिर खोदणे व दुरुस्ती १०० अनुदानावर शासनाद्वारे पुरविण्यात येते.

**मुख्य शब्द:** भारतीय कृषी निती, पारधी जमातीची शेती व परिवर्तण

**उद्देष:-** भारतीय कृषी धोरण व पारधी शेतकऱ्यांची स्थिती व आव्हाने यांचा अभ्यास करणे हा शोध निबंधाचा मुख्य उद्देष आहे.

**उपकल्पना:-**

१) पारधी शेतकऱ्यांची शेती अत्यंत मागास व पारंपारीक पद्धतीची आहे.

२) भारतीय कृषी धोरणाचा विकासात्मक प्रभाव पारधी शेतकऱ्यांच्या शेतीवर झालेला नाही.

३) बऱ्याच पारधी शेतकऱ्याकडे शेती संबधीत मालकीचे पट्टे नसल्याने कृषीधोरणाचा लाभ शेतकऱ्यांना झाला नाही.

**संषोधन पध्दती:-** सदर संषोधनात दुय्यम स्त्रोत व साधनांचा उपयोग करण्यात येईल.

**भारतीय कृषी धोरण:-**

केंद्रसरकारने २०२० ला नवीन कायदा बिल मंजूर व लागू करण्यात आला ते पुढील प्रमाणे

१) शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन कोणत्याही जागी, कुठेही विकण्याची स्वतंत्रता देणे.

२) शेतकरी देषातील कोणत्याही भागात आपले उत्पादन विकू शकतात.

३) उत्पादन वाहतूकीचा खर्च शेतकऱ्यांना करावे लागेल.

४) इ.ट्रेडींगची सुविधा निर्माण केली जाणार.

५) बाजार व्यतिरिक्त व्यापार क्षेत्रात फार्म गोट, कोल्डस्टोरीज, वेअर हाऊस तसेच प्रक्रिया केंद्राचे व्यापारीकरण करण्याचं स्वातंत्र्य राहिल.

६) या बिलाच्या माध्यमातून शेतकरी आणि व्यापारी सरळ संपर्कात येऊन यात मध्यस्थिचे उच्चाटन होईल.

**पारधी शेतकऱ्यांची स्थिती:-**

**१) शेतीचे पट्टे नाही:-**

पारधी शेतकरी आजही कसत असलेल्या शेतीचा मालक नाही. ८३ टक्के शेतकऱ्यांना आजही शेतीचे पट्टे मिळालेले नाही. वनहक्क कायद्यानुसार वनहक्क पट्टे प्रलंबित असल्यास संबंधीत शासकीय विभाग जबाबादार राहील. पारधी शेतकऱ्यांच्या मते केवळ सर्वेक्षणाचे काम शासनाद्वारे केले आहे. शेतीपट्टे बाबतीत ९० टक्के प्रकरणे प्रलंबित आहे. अद्यापही पारधी शेतकऱ्यांना अतिक्रमण पंजी उपलब्ध करून देण्यात आली नाही. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांनी व त्यांच्या उत्थानासाठी असलेल्या शासकीय धोरणाचा लाभ ९० टक्के पारधी शेतकऱ्यांना मिळाले नाही.

त्यामुळे मालकी भावना नाहीसी होऊन शेतीबद्दल निराषा झालेली दिसुन येते.

**२) जंगली जनावरांचा त्रासः-**

भारतात वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ मधील कलम ५१ नुसार वन्य प्राण्यांना मारणे, जखमी करणे, जंगल पर्यावरणाला अडथळा निर्माण करणे दंडनिय अपराध आहे. परंतु पारधी शेतकऱ्यांच्या ९८ टक्के शेती ह्या जंगलव्याप्त आणि जंगलाला लागुन असलेल्या क्षेत्रात आहे. जंगातील वन्य प्राणी नेहमीच शेतातील पीकांची नासधुस व फस्त करतात त्यामुळे ७० टक्के शेतातील पीक हे वन्यप्राण्यामुळे नाहीसे होतात. त्यामुळे पारधी शेतकऱ्यांची शेती ही पुर्णतः तोटयात आहे. त्यामुळे पारधी शेतकरी गरीबीत जिवन जगत आहे. वन्य जीव सरंक्षण कायदयामुळे शेतकऱ्यांवर बरेच बंधने आले आहेत.

**३) पारंपारीक शेतीः-**

१००टक्के पारधी शेतकरी पारंपारीक पद्धतीने शेती ही ९०टक्के निसर्गावर अवलंबुन आहे. आधुनिक पद्धतीच्या शेती करण्याचा पद्धतीचा अभाव असल्यामुळे शेतीची उत्पादकता कमी आहे. त्यामुळे पारधी शेतकरी दारिद्रिया अवस्थेत जिवन जगत आहे.

**४) सिंचनाचा अभावः-**

पारधी शेतकऱ्यांच्या ९५ टक्के शेतीजमीन जंगलव्याप्त तसेच जंगलाला लागुन आहे. शेतीही कमी प्रतिची डोंगराळ भागात असल्यामुळे सिंचनाच्या सोयीचा अभाव आहे. परिणामतः शेतीचे उत्पादन अत्यल्प आहे.

**५) जाती प्रमाणपत्र व शेतीपट्टे यांचा प्रष्नः-**

९० टक्के पारधी कुटुंबाना जाती प्रमाणपत्र व शेती पट्ट्यांचा प्रष्न कायम आहे. परिणाम स्वरूप शासकीय कृषी धोरणाच्या लाभापासुन पारधी शेतकरी उपेक्षीत आहे.

६) तंत्रज्ञान व मार्गदर्षनाचा अभावः-

पारधी शेतकरी आजही शेतकरी मेळावे, कृषी मार्गदषन व प्रषिक्षण यापासुन कोसो दुर आहे. त्यामुळे शेतीमधील तोटयाची शेती करण्याची पद्धती कायम आहे.

**उपाययोजना, निष्कर्ष व सुचनाः-**

१) शेतीचे पट्टे शेतकऱ्यांना मिळणे गरजेचे आहे. शासनाने नामवंत कडुन पारधी शेतकऱ्यांचा सर्वेक्षण करून शेतीपट्टे संदर्भात शासनाला अहवाल सादर करून शासनाने त्याची अमंलबजावणी करणे गरजेचे आहे.

२) पारधी शेतकऱ्यांसाठी कृषी प्रषिक्षण व तंत्रज्ञान विषयी तालुका स्तरावर मेळावे, चर्चासत्र व कार्यषाळेचे आयोजन करावे. जेणे करून पारधी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान अवगत होईल व शेतीची उत्पादन वाढवेल.

३) पारधी शेतकऱ्यांना शासनाच्या कृषी धोरणाचा जास्तीत जास्त लाभ होईल असे प्रयत्न होणे गरजेचे आहे. जेणे करून दारिद्रय रेषेखालील शेतकरी आपला कृषी उत्पादनात वाढ करेल.

४) वन्य जीवांमुळे पारधी शेतकऱ्यांच्या पिकांचे ७० टक्के नुकसान नियीमत होत आहे. याकरिता जंगलव्याप्त शेतीवर शासनाद्वारे चर्चा व धोरण महत्वाचे आहे. जेणेकरून बऱ्याच अंषी शेती व पारधी शेतकऱ्यांचे प्रष्न सुटतील.

वरील नविन भारतीय कृषी धोरणाचा कुठलाही प्रगती व सुधारात्मक प्रभाव पारधी जमातीच्या शेतकरी व त्यांच्या शेतीवर व उत्पनावर पडलेला नाही. पूर्वीची या पारधी शेतकऱ्यांची वाईट स्थिती व वर्तमान स्थिती यामध्ये कुठलेही विकासात्मक बदल वाटत नाही. हे येथे वरील अध्यनातून दिसून येते.६

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

1) https://hi.m.wikipedia.org.
2) Essaysinhindi.com.
3) Haryanafrrest.gov.in.
4) https://hcommons.org.
5) MkW-pOgk.k flaek] 'kkldh; mik;;kstuk vkf.k vkfnoklh lekt-